**<u>सन २०१३ मध्ये राष्ट्रीय पुरुष/थोर व्यक्तींचे जयंती दिनाचे कार्यक्रम साजरे करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:जपुती-२२१२/१०८४/प्र.क्र.३३९/२०१२/२९,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- १० जानेवारी, २०१३.

**<u>परिपत्रक</u>**

सन २०१३ मध्ये राष्ट्रपुरुषांची/नेत्यांची जयंती दिनाचे कार्यक्रम व राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम, यासोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे मंत्रालयात साजरे करण्यात येतील.

२. परिशिष्टात दर्शविलेले जे कार्यक्रम सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी किंवा महिन्यातील दुस-या व चौथ्या शनिवारी येत असले तरी ते कार्यक्रम त्या त्या दिवशीच साजरे करण्यात येतील.

३. विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील/जिल्हयातील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( भा. र. गावित )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्विय सहाय्यक,
मा. मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई,
सर्व मा. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई,सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासह)
प्रत माहितीस्तव व आवश्यक तेथे कार्यवाहीसाठी,
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
आयुक्त, सर्व महानगर पालिका, महाराष्ट्र राज्य,
निवासी आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.,
निवडनस्ती.

D:\jacky\JACKY\anil chaure\jayanti

संगणक संकेतांक:- 201301101728491007

## सन २०१३ मध्ये मंत्रालयात साजरे करावयाचे राष्ट्रीय पुरुषांचे/नेत्यांचे जयंती/पुण्यतिथी व अन्य कार्यक्रम

जपुती-२२१२/प्र.क्र.३३९/२९. दिनांक : १० जानेवारी,२०१३

| अ. क्र | प्रसंग | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय महिना व दिवस | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ०३ जानेवारी,२०१३ | गुरुवार | १३ पौष, शके १९३४ | संबंधितांच्या प्रतिमेस हार अर्पण करणे. |
| २ | जिजाऊ माँसाहेब जयंती | १२ जानेवारी,२०१३ | शनिवार | २२ पौष, शके १९३४ | --"-- |
| ३ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३ जानेवारी,२०१३ | बुधवार | ०३ माघ, शके १९३४ | --"-- |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी,२०१३ | मंगळवार | ३० माघ, शके १९३४ | --"-- |
| ५ | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च,२०१३ | मंगळवार | २१ फाल्गुन, शके १९३४ | --"-- |
| ६ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल,२०१३ | गुरुवार | २१ चैत्र, शके १९३५ | |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती. | १४ एप्रिल,२०१३ | रविवार | २४ चैत्र, शके १९३५ | --"-- |
| ८ | महात्मा बसवेश्वर जयंती | १३ मे ,२०१३ | सोमवार | २३ वैशाख, शके १९३५ | --"-- |
| ९ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस | २१ मे,२०१३ | मंगळवार | ३१ वैशाख, शके १९३५ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा घेणे. |
| १० | महाराणा प्रताप सिंह जयंती | ६ जून,२०१३ | गुरुवार | १६ जेष्ठ, शके १९३५ | संबंधितांच्या प्रतिमेस हार अर्पण करणे. |
| ११ | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६ जून, २०१३ | बुधवार | ०५ आषाढ, शके १९३५ | --"-- |
| १२ | वसंतराव नाईक जयंती | ०१ जूलै,२०१३ | सोमवार | १० आषाढ, शके १९३५ | --"-- |
| १३ | शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती | ०१ ऑगस्ट,२०१३ | गुरुवार | १० श्रावण, शके १९३५ | --"-- |
| १४ | क्रातिसिंह नाना पाटील जयंती | ०३ ऑगस्ट,२०१३ | शनिवार | १२ श्रावण, शके १९३५ | --"-- |
| १५ | सद्भावना दिवस | २० ऑगस्ट, २०१३ | मंगळवार | २९ श्रावण, शके १९३५ | सद्भावना दिनानिमित्ताने सामुहिकपणे सद्भावना प्रतिज्ञा घेणे. |
| १६ | महर्षि वाल्मिकी जयंती | १८ ऑक्टोबर,२०१३ | शुक्रवार | २६ अश्विन ,शके१९३५ | संबंधितांच्या प्रतिमेस हार अर्पण करणे. |
| १७ | वल्लभभाई पटेल जयंती | ३१ ऑक्टोबर,२०१३ | गुरुवार | ०९ कार्तिक,शके १९३५ | --"-- |
| १८ | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर,२०१३ | मंगळवार | २८ कार्तिक,शके१९३५ | संबंधितांच्या प्रतिमेस हार अर्पण करणे व राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेणे. |
| १९ | संविधान दिवस * | २६ नोव्हेंबर, २०१३ | मंगळवार | ०५ मार्गशिर्ष, शके १९३५ | संविधान दिवसानिमित्ताने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करणे. |

* शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :जपुती-२२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९, दिनांक २४/११/२००८ मधील सूचनेनुसार, विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी.

**भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करीता राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक, जपुती २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२४ नोव्हेंबर, २००८

**प्रस्तावना :-**

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य व समानता प्राप्त करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्य घटना अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वतःप्रत अर्पण केलेली आहे. सदर राज्य घटना ही दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अंमलात आली तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही देशाच्या बहुतेक नागरिकांना तसेच संविधानानुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनाही नाही. त्यामुळे या संविधानाने शासकिय, न्यायीक इत्यादी सारख्या यंत्रणा निर्माण झाल्या त्या संविधानाची ओळख सर्वांना करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस **"संविधान दिवस"** साजरा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

याप्रकरणी शासनाने साकल्याने विचार करुन राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती व्हावी यादृष्टिने **दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस"** म्हणून राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये, पुढीलप्रमाणे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) (परिशिष्ट-१ पहावे) सामुहिक वाचन करण्यात यावे.

२) संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा, महाविद्यालयामार्फत त्या दिवशी "संविधान यात्रा" काढण्यात यावी व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संचिधानातील महत्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) याबाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४) शासकिय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत इत्यादी.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, उपरोक्त कार्यक्रम साजरा करण्याकरीता येणारा खर्च संबंधीत प्रशासकिय विभागाने/कार्यालयाने हा त्यांच्या कार्यालयीन खर्चातून किंवा अशाच तऱ्हेच्या उद्दिष्टांसाठी असलेल्या तरतूदीतून भागवावा.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात वरील प्रमाणे **"संविधान दिवस"** साजरा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य शासनास दिनांक ५ डिसेंबर पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

टी. एफ. थेक्केकरा

**(टी.एफ.थेक्केकरा)**
**शासनाच्या प्रधान सचिव.**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्विय सहाय्यक
मा. मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई,
मा.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर व औरंगाबाद खंडपिठ.
सर्व मा. अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई,
मा. कुलपती, राज्यातील सर्व विद्यापिठे.
प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, राज्य माहिती आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, राज्य मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक माहिती वं जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासाठी)
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या विभागातील/जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व आयुक्त महानगर पालिका
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
सार्वजनिक बांधकाम विभाग, (प्रशा- ४ ) मंत्रालय मुंबई
निवड नस्ती.

परिशिष्ट-१

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**

**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा**

**व त्याच्या सर्व नागरिकांस:**

**सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;**

**विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा**

**व उपासना यांचे स्वातंत्र्य;**

**दर्जाची व संधीची समानता;**

**निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा**

**आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा**

**व राष्ट्राची एकता आणि एकात्मता**

**यांचे आश्वासन देणारी बंधुता**

**प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;**

**आमच्या संविधानसभेत**

**आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी**

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**

**करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

-----